# 2. वाक्यविचार

PAGE NO.
DATE:

घटक (४)

1) वाक्याचे विभाग (वाक्य पृथक्करण)
२) वाक्याचे प्रकार
3) वाक्यसंकलन
४) वाक्य रूपांतरण.

IMP ★ 1) वाक्याचे विभाग :

1) वाक्य म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे.
२) अर्थपूर्ण शब्दाला वाक्य म्हणतात.

उदा., मासा पाण्यात पोहते.

प्रथमोपस्थित घटक : (क्रियापद)
(कर्ता) उद्देश्य व विधेय असल्याशिवाय वाक्याला पूर्णतःव प्राप्त होत नाही. म्हणून त्यांना प्रथमोपस्थित घटक म्हणतात.

★ वाक्य पृथक्करण म्हणजे काय ?

'पृथक्' या शब्दाचा अर्थ वेगळे असा होतो. म्हणून वाक्य पृथक्करण म्हणजे वाक्यातील विविध घटक वेगवेगळे करून त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध दर्शविणे होय.

वाक्याचे विभाग (२)

उद्देश्य विभाग (२)
(कर्ता)
1) उद्देश्य
२) उद्देश्य विस्तार

विधेय विभाग (४)
(क्रियापद)
1) कर्म व कर्मविस्तार
२) विधानपूरक
3) विधेय विस्तार
४) विधेय

1) उद्देश्य (कर्ता) :

वाक्य ज्याच्याविषयी माहिती सांगते तो वाक्याचा कर्ता असतो. किंवा बोलणारा ज्याच्या विषयी बोलतो त्याला उद्देश म्हणतात. वाक्यातील क्रियापदामधील धातूला णारा, णारी, णारे प्रत्यय जोडून सजिव (कोण) किंवा निर्जीव (काय) ने प्रश्न केल्यास उत्तर कर्ता येते.

टिप : षष्ठीचा प्रत्यय (चा, ची, चे, च्या, स, ई, ए, ज्या) जोडलेला शब्द शक्यतो वाक्याचा कर्ता किंवा कर्म नसतो. त्यापुढील शब्द कर्ता किंवा कर्म असतो.

उदा., 1) रामरावाच्या कुत्रा मेला.
(मरणारा कोण ?)

2) काकाला बाळ झाले.
3) माझा पोपट बोलतो.
4) हरणाच्या कानात वारे शिरले.

2) उद्देश्य विस्तार :

कर्ता च्या विषयी माहिती सांगणारे शब्द जर कर्त्यापूर्वी आले असतील तर ते उद्देश विस्तारात लिहावे. या शब्दांना शक्यतो षष्ठीचे प्रत्यय लागतात.

1) नियमित अभ्यास करणारे विद्यार्थी पास होतात.

2) शेजारच्या घोडू धपकन पडला.

PAGE NO.
DATE:

★ विधेय विभाग :

1) कर्म व कर्मविस्तार.

i) कर्म

ज्याच्यावर प्रत्यक्ष क्रिया घडते तो कर्म

1) रामूने झाडाचा पेरू तोडला.
2) गवळ्याने म्हशीची धार काढली.

2) कर्म विस्तार :

कर्माविषयी माहिती सांगणारा शब्द म्हणजे कर्मविस्तार या शब्दाला षष्ठीचे प्रत्यय लागतात

1) रामूने झाडाचा पेरू तोडला.
2) गवळ्याने काळ्या म्हशीची धार काढली.

3) विधानपूरक.

कर्त्याविषयी माहिती सांगणारा शब्द जर कर्त्यानंतर आला तर ते विधानपूरक मानावे.

1) राम राजा आला.
2) माता शिक्षिका आहे.
3) पशु मोठ्याने घोरतो.
4) शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.

हे क्रियाविशेषण नसून विशेषण (विधानपूरक) आहे. स्वतः तो गुलमोहर

3) विधेय विस्तार :

क्रियापदाविषयी माहिती सांगणारे शब्द येतात. यात क्रियापदाला केव्हा, कोठे, कसे असे प्रश्न विचारल्यास

येणारे उत्तर कि क्रियाविशेषण असते.

1) काल सकाळी शेजारच्या बागेत हौदात कालराम धपकन पडला.

5) विधेय = क्रियापद.

1) ती सुंदर दिसते.
2) त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला.
3) शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.
4) लातूरचा गवळी रोज सकाळी गोठ्यात काळ्या म्हशीची धार काढतो.

* उद्देश विभाग (उद्देशांग) — विधेय विभाग (विधेयांग)

| | उद्देश्यविस्तार | उद्देश्य | कर्म व कर्मविस्तार | विधानपूरक | विधेय विस्तार | विधेय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | — | ती | - | सुंदर | — | दिसते |
| 2) | त्याचा धाकटा | मुलगा | | | आज क्रिकेटच्या सामन्या, चांगला. | खेळला, ~~दिसतो~~ |
| 3) | — | गुलमोहर | — | मोहक | शरदाच्या चांदण्यात, | दिसतो |
| 4) | लातूरचा | गवळी | काळ्या म्हशीची धार | — | सकाळी रोज. गोठ्यात. चळचळा | काढतो. |

DATE:

IMP

# वाक्याचे प्रकार (मुख्य) २.

अर्थावरून प्रकार (५)
1) विधानार्थी वाक्य
2) प्रश्नार्थी वाक्य
3) उद्‌गारार्थी वाक्य.
4) करणरूपी वाक्य
5) अकरणरूपी वाक्य.

विधानावरून प्रकार (3)
1) केवल वाक्य.
2) संयुक्त वाक्य
3) मिश्र वाक्य.

## गौण वाक्यांचे प्रकार.

1) नाम वाक्य
2) विशेषण वाक्य.
3) क्रियाविशेषण वाक्य

## क्रियापदाच्या रूपांवरून वाक्य.

1) स्वार्थी वाक्य.
2) आज्ञार्थी वाक्य
3) विध्यार्थी वाक्य
4. संकेतार्थी वाक्य

## ★ अर्थावरून प्रकार (५)

### १) विधानार्थी वाक्य.

ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते त्यास विधानार्थी वाक्य म्हणतात. वाक्याची सुरुवात कर्त्याने होते व शेवटी पूर्णविराम असतो. कोणतीही माहिती सांगणारे वाक्य विधानार्थी असते.

उदा., बाबा पंढरपुरला गेले.
कैलास निबंध लिहतो.
घुबड आकाशात उडाला.
गाय दुध देते.

२) प्रश्नार्थी वाक्य :
ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो त्यास प्रश्नार्थी वाक्य. शेवटी प्रश्नार्थ चिन्ह.
उदा. तु मुंबईस केव्हा जणार आहेस, ?
तुझे नाव काय आहे ?
कोणी कोंबडी पळवली. ?
तु उदया कोणता विषय अभ्यासणार आहेस. ?

३) उदगारअर्थी वाक्य.
ज्या वाक्यात भावनेचा उदगार काढलेला असतो. त्यास उदगारार्थी वाक्य म्हणतात. वाक्याच्या शेवटी उदगारवाचक (!) चिन्ह येते.
उदा., अबब! केवढा मोठा साप.
यात्रेत कोण गर्दी !
शी! काय हे तुझे अक्षर
अरेरे! बिचारीला ठेस लागली.

४) होकारार्थी / करणरूपी वाक्य :
ज्या वाक्यात होकार दर्शिविला जातो त्या वाक्यास होकारार्थी वाक्य.
उदा, नेहमी खरे बोलावे.
गोविंदा अभ्यास करतो.
रमेश पोहतो.

५) नकारार्थी / अकरणरूपी
ज्या वाक्यात नकार दर्शिविला जातो त्या वाक्यास अकरणरूपी वाक्य म्हणतात.
उदा, कधीही खोटे बोलू नये.
दुसऱ्याची निंदा करु नये.
सुदर्शन उद्याळ्या नाही.
गोविंदा मुळीच अभ्यास करत नाही.

## * विधानावरून वाक्य (३)

### १) केवलवाक्य / शुद्धवाक्य.

ज्या वाक्यात एकच उद्देश्य (कर्ता) व एकच विधेय (क्रियापद) असते त्या वाक्यास केवलवाक्य म्हणतात. या वाक्यात एकच मुख्य क्रिया असते. केवल वाक्य हे साधे वाक्य, विधानार्थी, होकारार्थी, नकारार्थी, आज्ञार्थी इ. प्रकारचे असू शकते.

उदा., मधू पुस्तक वाचतो.
सुर्य रोज पुर्वेला उगवतो.
तानाजी लढता लढता धारातीर्थी ~~पडेल~~ पडले.
आम्ही जातो आमच्या गावा.

### २) संयुक्त वाक्य :

ज्या वाक्यात दोन उद्देश्य आणि दोन विधेय येतात.

जेव्हा दोन किंवा अधिक केवलप्रयोग अव्यय वाक्य प्रधानत्व

उदा., १) आकाशात ढग नमू लागले आणि मोर नाचू लागला.
२) देह जावो अथवा राहो.
३) शेतकऱ्यांनी शेते सांगरली पण पाऊसच पडला नाही.
४) मधुने उत्तम भाषण केले म्हणून त्याला बक्षीस मिळाले.

3) मिश्र वाक्य :

1 प्रधान + 1/2 गौण वाक्य गौणत्व सूचक उभयान्वी उव्ययाने जोडून एक संमिश्र वाक्य तयार होते. त्यास मिश्र वाक्य म्हणतात.
उदा.,1) 1 रुपया म्हणजे 100 पैसे.
2) त्याला बढती मिळाली कारण त्याने योग्य कामगिरी बजावली.
3) शरीर बळकट व्हावे म्हणून मी व्यायाम करतो.
4) जर व्यायाम केला तर शरीर बळकट होईल.

टीप : जोडीच्या सर्वसामान्य ( जो - तो, जी - ती, जे - ते, ज्या - त्या) उभयान्वी अव्यय प्रमाणे वापर केल्यास ते वाक्य मिश्र वाक्य असते. यातील पहिले वाक्य गौण वाक्य असतील.
1) जे चकाकते (गौण) ते सोने नसते. (प्रधान)

* गौण वाक्य.
1) नामवाक्य
नामाचे कार्य करणाऱ्या वाक्याला नामवाक्य म्हणतात. मिश्र वाक्यातील एका वाक्याला काय ने प्रश्न विचारल्यास उत्तर येणारे वाक्य गौण वाक्य असते व प्रश्न विचारलेले वाक्य प्रधान वाक्य असते. असे गौण वाक्य प्रधान वाक्याच्या कर्माचे काम करते व कर्म नेहमी नाम असते. अशा वाक्यास नामवाक्य म्हणतात.
उदा., गुरुजी म्हणाले की, पृथ्वी गोल आहे.
( गुरुजी काय म्हणाले)

DATE:

## २. विशेषण वाक्य :

दुसऱ्या मुख्य वाक्यातील एखाद्या नामाबद्दल अधिक माहिती सांगणाऱ्या पहिल्या गौण वाक्याला विशेषण वाक्य म्हणतात. अशा वाक्यात शक्यतो जोडीचे अव्यये आलेले असतात.

उदा., जो आवडत सर्वांना तोची आवडे देवाला.

## ३. क्रियाविशेषण वाक्य :

पहिले गौण वाक्य जर दुसऱ्या प्रधान वाक्यातील क्रियापद क्रियाविशेषण किंवा विशेषण यांची बाबतीत काळ, स्थळ, रित, कारण, उद्देश, संकेत, या विषयी माहिती सांगत असले जर. ते क्रियाविशेषण गौण वाक्य असते.

उदा., आकाशात जेव्हा ढग जमू लागले तेव्हा मोर नाचू लागले. (कालवाचक क्रियाविशेषण वाक्य)

क्रियाविशेषण वाक्यचे पुढील प्रमाणे ७ प्रकार

### ① कालवाचक क्रियाविशेषण वाक्य :

दुसऱ्या मुख्य वाक्यातील क्रियेची वेळ पहिल्या गौण वाक्यात असते. मुख्य वाक्याला क्रिया केव्हा घडली असा प्रश्न विचारल्यास उत्तर गौण वाक्य येते.

उदा., जेव्हा विजा चमकू लागल्या तेव्हा पाऊस सुरु झाला.

### ② स्थलवाचक क्रियाविशेषण वाक्य :

मुख्य वाक्यातील क्रियेचे स्थळ गौण वाक्यात असते. मुख्य वाक्याला कोठे प्रश्न विचारल्यास उत्तर गौण वाक्य येते.

उदा., दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती.

* वाक्यरूपांतर

1

वाक्य रूपांतर म्हणजे एका प्रकारच्या वाक्याचे मूळ आशयार्थ बदलू न देतो दुसऱ्या प्रकारच्या वाक्यात रूपांतर करणे होय.

उदा., तो खरी खात्रीने येईल.

तो खरी आल्याशिवाय राहणार नाही.

* वाक्य रूपांतराचे प्रकार.

1) विधानार्थी व प्रश्नार्थी वाक्य यांचे परस्पर रूपांतर

* जर विधानार्थी वाक्य होकारदर्शक असेल तर त्याचे प्रश्नार्थ वाक्य नकार दर्शक करावे.

~~जर प्रश्ना०~~ 1) शेक्सपिअरची नाटके कोणाला आवडत नाहीत?

(प्रश्नार्थी वाक्य नकारदर्शक)

→ - शेक्सपिअरची नाटके ~~कोणाला~~ सर्वांनाच आवडतात.

(2) जगी सर्व सुखी असा कोणी नाही. ? (विधानार्थी नकारदर्शक)

— जगी सर्व सुखी असा कोण आहे ?

(3) मध्यरात्री स्मशानभूमी कोणी जाणार नाही (विधानार्थी नकारदर्शक)

— मध्यरात्री स्मशानभूमीत कोण जाईल ?

* विधानार्थी वाक्य व उद्गारार्थी वाक्य यांचे परस्पर रूपांतर

* उद्गारार्थी वाक्यांचे विधानार्थी वाक्याचे रूपांतर करत असताना केवल प्रयोगी अव्यये, व इतर प्रकारचे शब्द वगळून त्या ऐवजी वाक्याचा मूळ अर्थ कायम रहावा म्हणून योग्य ते नवीन शब्द वापरावे.

PAGE NO.
DATE:

जसे -, किती - अत्यंत.
काय - फार
कोण - अमका अतोनात
केवढी - खूप.

१. मी... आलो तर!
मी... होण्याची फार इच्छा आहे.

२) किती सुंदर चित्र है! (उद्गारार्थी)
- हे चित्र अत्यंत सुंदर आहे. (विधानार्थी)

३) काय वेगात पळाला तो शर्यतीत! (उ)
- तो शर्यतीत फार वेगात पळाला (वि)

४) आज जत्रेत कोण गर्दी! (उ)
- आज जत्रेत अतोनात गर्दी होती. (वि)

५) केवढी उंच ही इमारत ही! (उ)
- ही इमारत खूप उंच आहे. (वि)

६) मी पक्षी झालो तर. (उ)
- मला पक्षी होण्याची फार इच्छा आहे

* होकारार्थी वाक्य व नकारार्थी वाक्य यांचे परस्पर रूपांतर.

होकारार्थी व नकारार्थी वाक्याचे परिवर्तन करताना वाक्याचा मूळ अर्थ कायम ठेवावे त्यासाठी नकारदर्शक उपसर्ग योग्य त्या शब्दांचे विरुद्धार्थी रूप वापरावे.

(१) अमेरिका श्रीमंत राष्ट्र आहे (हो)
- अमेरिका गरीब राष्ट्र नाही (न).

२) हे आम्हाला सोईचे नाही (न).
- हे आम्हाला गैरसोईचे आहे (हो)

३) उद्या मुख्यमंत्री ~~येणे~~ लातूरात आहेत. (हो)
- उद्या मुख्यमंत्री लातूरात नाहीत असे नाही.

४) धुम्रपान टाळावे. (हो)
- धुम्रपान करू नये. (न)

५) केवल, संयुक्त व मिश्र..

दोन किंवा अधिक केवल वाक्य दिले असता. च, ऊन, वर, असताना मुळे इ. शब्द वापरून केवल वाक्य तयार करावे. तर प्रधानत्वसूचक उभयान्वयी ~~अव्य~~ अव्यये वापरून संयुक्त वाक्य बनवावे आणि मिश्र वाक्य बनवताना गौणत्व सूचक उभयान्वयी अव्यय वापरावे.

१) गुरुजी वर्गात आले. विद्यार्थी उभे राहिले.
→ गुरुजी वर्गात येताच विद्यार्थी उभे राहिले. (केवल वाक्य)
गुरुजी वर्गात आले आणि विद्यार्थी उभे राहिले. (संयुक्त)
जेव्हा गुरुजी वर्गात आले तेव्हा विद्यार्थी उभे राहिले. (मिश्र)

२) आरती सुरु झाल्यावर घंटानाद सुरु झाला. (केवल)
आरती सुरु झाली आणि घंटानाद सुरु झाला.
जेव्हा आरती सुरु झाली तेव्हा घंटानाद सुरु झाला.